**इनाम/वतन जमिनीचा नजराणा निश्चित करताना, बाजारमुल्य तक्त्यानुसार मुल्यांकन विचारात घेणे. तसेच परवानगीच्या दिनांकाचे मुल्य विचारात घेऊन नजराणा आकारणे.**

**महाराष्ट्र शासन**
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्रमांक: बिआयडब्ल्यू-२००८/प्रक्र. १०८/ल-४
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: ०१ एप्रिल, २००९.

**प्रस्तावना:-**

ईनाम अथवा वतन प्रकारच्या जमिनीस अकृषिक परवानगी देताना अनर्जित उत्पन्नातील शासनाचा जो हिस्सा वसूल केला जातो तो परिगणित करताना कोणत्या वर्षाचे मुल्यांकन विचारात घेण्यात यावे हे निश्चितपणे निर्देशित केलेले नव्हते. ते करणे आवश्यक होते. तसेच अशा जमिनींना अकृषिक परवानगी देताना अनर्जित उत्पन्नाची रक्कम म्हणून परिगणित करण्यासाठी कोणते मूल्य आधारभूत धरण्यात यावे असा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. शिवाय, प्रत्यक्षात बिनशेतीसाठी आदेश देताना वा हस्तांतरणास परवानगी देताना, प्रत्यक्षात नजराणा वसूल करताना अर्जदारास, अर्ज केल्याच्या दिनांकाचे वा प्रत्यक्षात परवानगी आदेश दिलेल्या दिनांकाचे यापैकी कोणत्या दिनांकाचे मूल्य विचारात घ्यावे हे देखील शासनाच्या विचाराधीन होते. या दोन्ही प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने आता पुढीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

**शासन निर्णय:-**

इनाम/वतन जमिनीच्या नजराण्याबाबत शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे:-

१) इनाम/वतन जमिनीचा नजराणा आकारताना "बाजारमूल्य दर तक्त्यात" नमूद केलेले मूल्यांकन विचारात घेऊन नजराणा निश्चित करावा.

२) असे मूल्यांकन विचारात घेताना इनाम/वतन जमिनीच्या खरेदी/विक्रीस, जमीन भोगवटादार वर्ग-२ वरुन भोगवटादार वर्ग-१ करण्यास वा जमिनीच्या बिनशेती वापरास, ज्या दिनांकास परवानगी दिली जाते, त्या दिनांकाचे बाजारमूल्य दर तक्त्यानुसार येणारे मूल्य विचारात घेऊन नजराणा आकारावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

( जे. पी. डांगे )
अपर मुख्य सचिव (महसूल)
महाराष्ट्र शासन

प्रति,
१) सर्व विभागीय आयुक्त
२) सर्व जिल्हाधिकारी
३) जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.
४) नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक, पुणे.
५) सर्व उपविभागीय अधिकारी
६) सर्व तहसिलदार
७) निवडनस्ती, ल-४ कार्यासन, महसूल व वन विभाग.

TNC